# प्रसिध्दी पत्रक

**1)श्री. सम्राट सुरेद्र माने, पोलीस नाईक, ब. नं.1155,(वर्ग-03), 2) योगेश बिभीषण खटाने, पोलीस उपनिरीक्षक, (वर्ग-02 अराजपत्रीत), 3) अनोळखी वाहन चालक, तीघे नेमणुक पो.ठाणे वाशी 4) वाळासाहेब बिभीषण हाके, रा. सरमकुंडी ता. वाशी, जि. उस्मानाबाद (खाजगी ईसम) यांनी 30,000/- रुपये लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद च्या जाळयात**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | 1)श्री. सम्राट सुरेद्र माने, पोलीस नाईक, ब. नं.1155,(वर्ग-03), 2) योगेश बिभीषण खटाने, पोलीस उपनिरीक्षक, (वर्ग-02 अराजपत्रीत), 3) अनोळखी वाहन चालक, तीघे नेमणुक पो.ठाणे वाशी 4) वाळासाहेब बिभीषण हाके, रा. सरमकुंडी ता. वाशी, जि. उस्मानाबाद (खाजगी ईसम) |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.17.05.2020 रोजी सरमकुंडी येथे सरमकुंडी ते तांदळवाडी जाणारे रोडवर |
| तपासी अधिकारी | श्री. ए. एच. हुलगे, पोलीस निरीक्षक |
| लाचेची रक्कम मागणी | 50,000/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचा मुरुमाचा ट्रॅक्टर जप्त न करणे, गुन्हा दाखल न करणे व अटक न करणे या कामासाठी |

यातील तक्रारदार हे शेती व्यवसाय करीत आहेत. श्री.माने, पोलीस नाईक, श्री.योगेश खटाने, पोउपनि पो.ठाणे वाशी यांनी तक्रारदार यांचा मुरुम ट्रॅक्टर जप्त न करणे, त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे वाशी येथे गुन्हा दाखल न करणे व अटक न करणे या कामासाठी 50,000/- रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना श्री. माने, पोलीस नाईक व श्री.योगेश खटाने, पोउपनि यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.17.05.2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथे तशी तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने श्री.माने, पोलीस नाईक यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे वरील नमुद कारणासाठी तडजोडीअंती 45,000/-रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे दि.17.05.2020 रोजी सरमकुंडी येथे सापळा आयोजीत केला असता श्री.सम्राट माने, पोलीस पोलीस नाईक यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेच्या मागणीप्रमाणे पहिला हप्ता म्हणुन 30,000/- रुपये लाच रक्कम स्विकारुन लाच रक्कम घेवुन पळुन जाताना पो. नि. श्री. पाबळे यांनी हाताने थांबण्याचा ईशारा करुन जिप थांबविण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी जीप न थांबवता जीपमधील पोउपनि खटाने यांनी जोराचा धक्का देवुन खाली पाडुन पो. नि. श्री. पाबळे यांना जखमी केले व जीपमधुन पळुन गेले. त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे वाशी येथे गुन्हा दाखल झाला आहे.

सदर कारवाई करण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक श्री.अरविंद चावरीया, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही स्वत:, श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक पोह/कठारे, उगलमुगले, पोना/डमरे, मारकड, जाधव, पोशि/ बेळे व चालक कांबळे, यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :-**

**1)** मा.श्री.अरविंद चावरीया, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8530255500

**2)** श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 9527943100,

**3) टोल फ्री क्र. 1064**, दूरध्वनी क्र.- 02472-222879

**E-Mail ID:-**dyspacbosmanabad@mahapolice.gov.in, 2)dysposmanabad@gmail.com

**(प्रशांत संपते)**
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद.